# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. ७४/२०२१

विषय : कोव्हीड–१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने शाळा/महाविद्यालये/सर्व खाजगी क्लासेस व इतर शाळा दि. ०१ मार्च २०२१ ते दि. १४ मार्च २०२१ पर्यंत बंद ठेवण्याबाबत.

कोव्हीड–१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने पारीत केलेले आदेश, निर्देश, SOP इत्यादींचे प्रभावी अंमलबजावणीबाबत शासनाने दिलेल्या आदेशानुसार महाविद्यालयातील प्रत्यक्ष अध्यापनाचे नियमित वर्ग दि. २८/०२/२०२१ पर्यंत बंद ठेवण्याबाबत विद्यापीठाने परिपत्रक क्र. ४२/२०२१ संदर्भ क्र. शै. प्रवेश/१०४६ दि. २२/०२/२०२१ अन्वये सर्व संबधिताना सूचना दिलेल्या होत्या.

तथापि, पुणे जिल्हयात कोव्हीड–१९ विषाणुचा प्रादुर्भाव वाढत असल्याने विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने शाळा/महाविद्यालये/सर्व खाजगी क्लासेस व इतर शाळा दि. ०१ मार्च २०२१ ते दि. १४ मार्च २०२१ पर्यंत बंद ठेवण्याबाबत मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे यांनी संदर्भ क्र. जि.का./आ.व्य./कावि/२०८/२०२१ दि. २८/०२/२०२१, मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र. मआ/सांप्रवि/८५७७ दि. २८/०२/२०२१ तसेच मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांनी संदर्भ क्र. वैद्य/०९/कावि/७५७/२०२१ दि. २८/०२/२०२१ अन्वये आदेश दिलेले आहेत. सोबत आदेशाची प्रत जोडत आहे.

या परिपत्रकाव्दारे सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था यांना कळविण्यात येते की, मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे, मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका व मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करून काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच नाशिक व अहमदनगर जिल्हयातील सर्व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था यांनी जिल्हा प्रशासन/स्थानिक प्राधिकरण यांनी निर्गमित केलेल्या आदेशानुसार महाविद्यालय बंद ठेवण्याबाबत कार्यवाही करावी.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/१२३३ )
दिनांक : ०१/०३/२०२१ )

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :–

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये
मा. संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था

प्रत माहितीसाठी :–

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे
मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे
मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे
मा. सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे

# शाळा महाविद्यालय क्लासेस बंद आदेश PDF

## जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

टोल फ्री क्रमांक :१०७७ दुरध्वनी क्रमांक :०२०-२६१२३३७१, Email id - collector.pune@maharashtra.gov.in

क्र. जि.का./आ.व्य./कावि/२०८/२०२१ दिनांक :- २८ /०२/२०२१

वाचले:

१. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७,
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
३. आपत्तीव्यवस्थापनकायदा २००५ चे कलम ३० , ३३ , ३४ , ४१ व कलम ५१,
४. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक कोरोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५, दिनांक १३/०३/२०२०.१४/०३/२०२० तसेच १५/०३/२०२० रोजीची अधिसुचना.
५. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक २३ व २४ मार्च २०२०.
६. या कार्यालयाकडील आदेश क्रं.जि.का./क्रं.आ.व्य./कावि/१७९४/१८१८/२३९९/२३८८/२८६५/२०२० दि.२३ जुन २०२०, दि. २५ जुन २०२०, दि.२८ ऑगस्ट, २०२०, दि.२६ ऑगस्ट २०२०, दि.२३ सप्टेंबर २०२०,
७. या कार्यालयाकडील आदेश क्रं.जि.का./क्रं.आ.व्य./कावि/२५१४/२०२० दि.०४ सप्टेंबर २०२०
८.मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/२०२०/CR.९२/DisM-1. दिनांक ३०/१०/२०२० रोजीचे आदेश.
९. मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांचेकडील परिपत्रक क्रं.सा.प्र.२/आरआर/५१/२०२१, दि.०५.०१.२०२१
१०.उप सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय (विस्तार), मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रं- संकीर्ण ८२२०/ प्र.क्र.२२४/सा.का.४, दि.०५/०१/२०२१.
११. मुख्य सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील No. DMU/२०२०/CR.९२/DisM-1. दिनांक 29/01/2021 रोजीचे आदेश.
१२. मा. मुख्यमंत्री आणि मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली दि. १६ फेब्रुवारी २०२१ रोजीचे व्ही. सी. मधील सूचना
१३. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रं.कोरोना-२०२०/सीआर क्रं.८५/अेअे-५ दि.१७.०२.२०२१
१४. या कार्यालयाकडील आदेश क्रं.जि.का./ आ.व्य./कावि/१५८/२०२१ दि.१८ फेब्रुवारी २०२१
१५. मा.उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.२१/०२/२०२१ रोजी झालेली बैठक
१६.या कार्यालयाकडील आदेश क्र. जि.का./आ.व्य./कावि/१७६/२०२१, दि.२१/०२/२०२१

---

**विषय :- कोव्हीड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने शाळा/महाविदयालये/सर्व खाजगी क्लासेस व इतर शाळा दि.०१ मार्च २०२१ ते दि.१४ मार्च २०२१ पर्यंत बंद ठेवणेबाबत**

**आदेश:**

**ज्याअर्थी,** उपरोक्त वाचा.२ चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० प्रसिद्ध केले असून यातील नियम क्रं.३ नुसार कोरोना विषाणुमुळे (COVID-१९) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्याचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

**आणि, ज्याअर्थी**, संदर्भ क्रं.१६ च्या अनुषंगाने पुणे जिल्हयात कोव्हिड- १९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाय योजना करणेच्या अनुषंगाने दि.२८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत पुणे जिल्हयातील सर्व शासकीय व खाजगी शाळा/ महाविदयालये /सर्व खाजगी क्लासेस बंद ठेवण्यात आले आहेत. परंतु,पुणे जिल्हयात कोव्हीड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव वाढत असल्याने कोव्हीड १९ बाधीत रुग्णांमध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

त्याअर्थी मी डॉ.राजेश देशमुख, जिल्हाधिकारी पुणे तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार पुणे जिल्हयातील सर्व शासकीय व खाजगी शाळा/महाविदयालये /सर्व खाजगी क्लासेस व इतर शाळा दि.१४/०३/२०२१ पर्यत बंद ठेवण्याचा आदेश देत आहे.मात्र ऑनलाईन पध्दतीने शाळा/महाविदयालये /सर्व खाजगी क्लासेस व इतर शाळा सुरु राहतील तसेच पुणे जिल्हयात १० वी व १२ वी च्या विदयार्थ्यांचे नुकसान होणार नाही यासाठी संबधित शिक्षणाधिकारी, गट शिक्षण अधिकारी यांनी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. नियोजित परिक्षा आवश्यक असल्यास कोरोना १९ विषाणुच्या उपाय योजनांचे पालन करुन घेण्यात याव्यात. शक्यतो ऑनलाईन पध्दतीने परिक्षा घेण्यात याव्यात.

सदर आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती, संस्था आणि संघटना यांनी उल्लघंन केल्यास त्यांचे विरुद्ध आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ आणि साथरोग कायदा, १८९७ आणि या संदर्भातील शासनाचे इतर अधिनियम व कायद्यातील इतर नियमान्वये योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक२८/२ /२०२१ पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.**

**(डॉ. राजेश देशमुख)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे**

प्रत:-

१. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तन रायिगय सादर,
२. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर

**प्रत- आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
२. पोलीस अधीक्षक, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
३. उपवनसंरक्षक, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
४. जिल्हा शल्य चिकित्सक, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
५. जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
६. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
७. जिल्हा क्रिडा अधिकारी, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
८. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र.जि. का. पुणे, यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
९. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांना व्यापक प्रसिध्दीसाठी
१०. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
११. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा..जि. प. पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१२. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१३. असिस्टंट इंन्सिडंट कमांडर तथा तासुका दंडाधिकारी सर्व जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१४. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१५. मुख्य कार्याकारी अधिकारी छावणी परिषद, मुख्याधिकारी सर्व नगर परिषद, नगरपालिका, नगर पंचायत जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१६. सर्व संबंधितास आस्थापना प्रमुख यांना यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अनुपालनास्तव,

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे – ४११००५
Email id: mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/माप्रवि/ ८५७८
दिनांक : २८/०२/२०२१

## आदेश

विषय:- कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश-लॉकडाऊन टप्प्याटप्याने उठविणे आणि या कालावधीत प्रतिबंधने कमी करणेबाबत (मिशन बिगिन अगेन).
पुणे महापालिका क्षेत्रामधील शाळा, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये इ. बाबत सुधारित आदेश

संदर्भ:-
१) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,मंत्रालय मुंबई क्रमांक कोरोना २०२०/प्र क्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४ मार्च २०२०
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम,१८९७
४) महसूल व वनविभाग,महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/DISM-1 दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल २०२०,२९ जून २०२०,६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, १४ ऑक्टोबर २०२०, २३ ऑक्टोबर २०२०, ३ नोव्हेंबर२०२०, १४ नोव्हेंबर२०२०,२३ नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०, २१ डिसेंबर २०२०, २९ डिसेंबर२०२०, १४ जानेवारी २०२१, , १० फेब्रुवारी २०२१
५) मा आयुक्त ,पुणे महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र.म.आ/माप्रवि/२९२३, दि.३१.०७.२०२०,२९३४,दि.०३.०८.२०२०, ३७९१,दि.०२.०९.२०२०, ४६१५,दि.०१.१०.२०२०, ४८२३,दि.०९.१०.२०२०, ४८७४,दि.१३.१०.२०२०, ५१३५,दि.२१.१०.२०२०, ५१९६,दि.२४.१०.२०२०, ५३४२,दि.२९.१०.२०२०, ५३४५,दि.३१.१०.२०२०, ५४६७,दि.०५.११.२०२०, ५६४३,दि.१९.११.२०२०, ५९४७,दि.०१.१२.२०२०, ६६०८,दि.२२.१२.२०२०, ६८३८,दि.३१.१२.२०२०, ७१३९,दि.११.०१.२०२१, ७३५५,दि.१६.०१.२०२१, ७४५८,दि.२०.०१.२०२१, ७५४७,दि.२२.०१.२०२१, ७५७४,दि.२२.०१.२०२१, ७७८५,दि.०१.०२.२०२१, ८०२१, दि.०९.०२.२०२१,८२७४,दि.१८.०२.२०२१, ८३०८,दि.२१.०२.२०२१

ज्याअर्थी, उपरोक्त संदर्भ क्र. ४ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात निर्बंध शिथील व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठविणे ( मिशन बिगिन अगेन ) संदर्भात कोविड – १९ या आजाराच्या प्रसाराम प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पुणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा

२००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे महापालिका क्षेत्रातील शाळा, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये इ. बाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करीत आहे.

१) पुणे शहरात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेता महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये यांचे नियमित वर्ग, सर्व खाजगी शिकवणी वर्ग ( Coaching Classes ) दिनांक १ मार्च२०२१ ते १४ मार्च २०२१ पर्यंत बंद राहतील. मात्र ऑनलाईन शिक्षणास मुभा राहील.

२) पुणे महानगरपालिका क्षेत्रात कोणत्याही व्यक्तीस अत्यावश्यक कारण/ सेवा वगळता दिनांक १ मार्च २०२१ पासून रात्री ११:०० ते सकाळी ०६:०० यावेळेत संचार करणेस प्रतिबंध असेल. मात्र यामधून जीवनावश्यक वस्तूंचा (दुध,भाजीपाला,फळे इ.) पुरवठा करणारे, वृत्त पत्र सेवा व अत्यावश्यक सेवा पुरवणारे आस्थापना / व्यक्तींना व त्यांच्या वाहनांना वगळण्यात येत आहे. तसेच ज्या उद्योगांचे शिफ्टमध्ये कामकाज चालते अशा संबंधित आस्थापनेवरील कर्मचाऱ्याना व त्यांची ने-आण करणाऱ्या वाहनांना सदर आदेशामधून वगळण्यात येत आहे.

३) संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

४) पुणे महानगरपालिकेने यापूर्वी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६०, तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील.

सदर आदेश दि. ०१.०३.२०२१ पासून पुढील आदेशापर्यंत पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि. २८.०२.२०२१ रोजी दिलेला आहे.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF POONA
पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सन-१९५० ★EST.1950★

( विक्रम कुमार )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत -१) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे
२) मा. पोलीस आयुक्त,पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे.
३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.
यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे - ४११ ०१८
फोन नं. ०२० - ६७३३३३३३
फॅक्स नं. ०२० - २७४२५६००
वेबसाईट:-www.pcmcindia.gov.in

क्र.वैद्य/०९/कावि/७५७/२०२१ दि. २८/०२/२०२१

**विषय:- कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे सुधारित आदेश -लॉकडाऊन टप्प्याटप्प्याने उठविणे आणि या कालावधीत प्रतिबंधने कमी करणेबाबत (मिशन बिगिन अगेन).**

**संदर्भ:**-१) शासन परिपत्रक क्रमांक-समय २०२०/प्र.क्र. ३५/१८ (रा.व.फा.) दिनांक०७/०४/२०२०
२) मा. विभागीय आयुक्त (पुणे) कार्या क्रासा.प्र.१/आरआर/१०२४/२०२० यांचे दिनांक २८/०८/२०२० रोजीचे पत्र.
३) अधिसूचना सार्वजनिक आरोग्यविभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल मंत्रालय मुंबई, प्रामांक कोरोना २०२० /प्रक्र.५८/आरोग्य- ५, दिनांक १४मार्च २०२०
४) आपत्ती व्यवस्थापन कायदा२००५,
५) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
६) महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. महसूल व वनविभाग (DMU/2020/CR.92/DISM,1) दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल, २९ जुन २०२०, ६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, १४ ऑक्टोबर २०२०, २९ ऑक्टोबर २०२०, ३ नोव्हेंबर २०२०, १४ नोव्हेंबर २०२०, २३नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०, २१ डिसेंबर २०२०, २४ डिसेंबर २०२०, २९ डिसेंबर २०२०, १४ जानेवारी २०२१, १० फेब्रुवारी २०२१

## आदेश

ज्याअर्थी उपरोक्त संदर्भ क्र.६ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात निर्बंध शिथील व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठविणे (मिशन बिगिन अगेन) संदर्भात कोविड १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत,

ज्याअर्थी, सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड -१९ उपाययोजना नियम २०२० अंमलात आलेले आहेत, महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी राजेश पाटील, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील शाळा, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये इ. बाबत** खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करीत आहे.

१. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील **सर्व शैक्षणिक संस्था, प्राथमिक व माध्यमिक शाळा, महाविद्यालये यांचे नियमित वर्ग तसेच खाजगी शिकवणी वर्ग(Coaching Classes) दिनांक १ मार्च २०२१ ते दिनांक १४ मार्च २०२१ पर्यंत पूर्णतः बंद राहतील.** मात्र ऑनलाईन शिक्षणास मुभा राहील.
२. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात कोणत्याही व्यक्तीस अत्यावश्यक कारण/सेवा वगळता दि.१ मार्च २०२१ पासून रात्री ११:०० ते सकाळी ०६:०० यावेळेत संचार करणेस प्रतिबंध असेल,

मात्र यामधून जीवनावश्यक वस्तूंचा (दुध, भाजीपाला, फळे इ.) पुरवठा करणारे, वृत्त पत्र सेवा व अत्यावश्यक सेवा पुरवणारे आस्थापना/व्यक्तींना व त्यांच्या वाहनांना वगळण्यात येत आहे. तसेच ज्या उद्योगांचे शिफ्टमध्ये कामकाज चालते अशा संबधित आस्थापनेवरील कर्मचा-यांना व त्यांची ने-आण करणा-या वाहनांना सदर आदेशामधून वगळण्यात येत आहे.

३. संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश /मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

४. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने यापुर्वी निर्गमित केलेले आदेश/मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६० तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील.

सदर आदेश दि. २८.०२.२०२१ पासून पुढील आदेशापर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि. २८. ०२.२०२१ रोजी दिलेला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापना ११/१०/८२ पिंपरी, पुणे-४११०१८

28/02/21

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

**प्रत माहितीस्तव सादर -**

१) मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

३) मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालय, चिंचवड

४) सर्व क्षेत्रिय अधिकारी व सबंधित विभाग प्रमुख

यांचेकडे माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित